## ⁕ ऑनलाईन दर्शन बुकिंग पास बाबत सर्वसाधारण माहिती व सुचना ⁕

1. भाविकांची संख्या मर्यादित ठेवण्याच्या दृश्टीने ऑनलाईन दर्शन पास बुकींग पध्दतीने दैनंदिन ४८०० भाविकांना प्रायोगित तत्वावर मुखदर्शन उपलब्ध करून देणे. मंदिर समितीच्या संकेतस्थळ व मोबाईल ॲपवरून प्रत्यक्ष दर्शनाच्या जास्तीत जास्त 8 दिवसाच्या व कमीत कमी 1 दिवस अगोदर ऑनलाईन बुकींग करता येईल. त्यामध्ये त्यांना तारीख व वेळ निष्चित करून दिली जाईल. तसेच याबाबतचा छापील पास भाविकांना ॲपवरून प्रिंट करून घेता येईल.
2. **१० वर्षाचे आतील व ६५ वर्षाचे वरील, तसेच गर्भवती महिलांना श्री' चे दर्शनाकरिता शासन नियमानुसार मंदिरात प्रवेश देता येणार नाही**
3. या पासद्वारे **श्रीचे फक्त मुखदर्शन देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.** पास ज्या व्यक्तीच्या नावे आहे, त्याच व्यक्तीलाच दशनरांगेत सोडण्यात येईल. त्याच्या सोबत असलेल्या अन्य व्यक्तींना विनापास सोडण्यात येणार नाही.
4. दर्शनासाठी येताना ऑनलाईन पाससोबत स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र सोबत ठेवणे बंधनकारक आहे.
5. दर्शनपास असलेल्या भाविकांने मास्क परिधाण करणे बंधनकारक आहे.
6. दर्शन रांगेमध्ये चालत असताना दोन भाविकांमध्ये किमान पाच फुट अंतर ठेवणे बंधनकारक आहे.
7. सॅनिटायझरचा वापर करणे बंधनकारक राहील.
8. दर्शनरांगेतील इतर वस्तूंना स्पश करणे टाळावे.
9. कोरोनाचा प्रादुर्भाव असलेल्या भाविकांचा समावेश दर्शनरांगेमध्ये होवू नये या दृश्टीने थर्मल स्क्रिनिंग, पल्स ऑक्सीमीटर तपासणी, मास्क तपासणी इत्यादी गोष्टी मंदिर समितीकडून केल्या जातील याची नोंद घ्यावी.
10. उपरोक्त तपासण्यांमध्ये एखादा भाविक निश्चित केलेल्या मानकांनुसार बाधीत आढळून आल्यास त्यास दर्शन घेता येणार नाही याची नोंद घ्यावी.
11. ज्या भाविकांमध्ये ताप, खोकला, शिंका इ. लक्षणे दिसून येतील त्यांना दर्शनासाठी परवानगी नाकारण्यात येईल. भाविकांनी आपल्या डोळयांना, नाकाला किंवा तोंडाला स्पर्श करू नये. आजारी व्यक्तींना दशनासाठी येण्याचे शक्यतो टाळावे.

12. ऑनलाईन बुकींग मंदिर समितीच्या **www.vitthalrukminimandir.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

13. या ऑनलाईन बुकींगद्वारे फक्त मुखदर्शन सुविधा प्राप्त होणार आहे याची भाविकांनी नोंद घ्यावी.

14. मुखदर्शन पासवर दिलेल्या वेळेतच भाविकांना **कासारघाट (स्कायवाक प्रारंभापासून)** येथून तपासणी करून दर्शनासाठी सोडण्यात येईल.

15. पासवर नमुद केलेल्या वेळेनंतर आलेल्या भाविकांचा विचार करण्यात येणार नाही व त्यांना दर्शन मिळणार नाही याची नोंद घ्यावी.

16. ऑनलाईन दर्शन बुकींगची सेवा विनामुल्य आहे.

17. श्रीचे पदस्पर्श दर्शन भाविकांना उपलब्ध न करता ऑनलाईन दर्शन प्रणालीद्वारे बुकींग करून मुखदर्शन उपलब्ध करून देणे.

18. मास्क परिधाण करणे बंधनकारक आहे. दोन भाविकांमध्ये पाच फुट अंतर ठेवणे बंधनकारक आहे.

19. मंदिर समितीस सहकार्य करावे.